आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ मार्च २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नवी दिल्लीत साडेतेहतीस हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं लोकार्पण आणि पायाभरणी

- पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त प्रदेशातून आतापर्यंत ५२ हजारापेक्षा जास्त भारतीय नागरिक सुरक्षितपणे मायदेशी परतले

- महाराष्ट्रात ‘राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण’ मोहिमेचा आज  प्रारंभ

- भारताचा लक्ष्य सेन ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज अहमदाबादमधे भारत आणि न्यूझीलंडमधे रंगणार

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत  आहे .  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महिला दिनानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. महिला या समाजाच्या आधारस्तंभ असून जर महिला सुशिक्षित, स्वावलंबी आणि सक्षम असतील तर त्या देशाला समृद्ध आणि प्रगतिशील बनवण्यासाठी मोठे योगदान देऊ शकतात असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

-   - -.. **होल्ड- बाईट- राष्ट्रपती - - -**

महिलांच्या आंतरिक शक्तीमुळे आणि धडाडीच्या वृत्तीमुळे त्यांच्या  कुटुंबांचं, समाजाचं आणि देशाचं भवितव्य घडत असल्याचं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

देशाच्या नारीशक्तीच्या कामगिरीचा देशाला अभिमान असून देशाच्या प्रगतीत त्यांच्या परिवर्तनकारी भूमिकेचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नागालँडचे मुख्यमंत्री नेफयू रियो, जम्मूकाश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने महिलांसाठी अस्मिता राष्ट्रव्यापी ऍथलेटिक्स लीग स्पर्धा आयोजित केली आहे. देशभरात खेलो इंडिया उपक्रमाअंतर्गत या अस्मिता लीग स्पर्धांचं आयोजन होत असून देशातल्या तळागाळातल्या महिला आणि मुलींना ऍथलेटिक्स स्पर्धांसाठी व्यासपीठ मिळवून देण्याचं या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रात **छत्रपती संभाजी नगर** इथं आज केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महिलांसाठी विशेष अस्मिता लीग स्पर्धांचं उद्घाटन झालं. तसेच महिलांसाठी वॉकेथॉन आणि सायकल स्पर्धांना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

अस्मिता अंतर्गत **केरळ**मध्ये आयोजित होणाऱ्या लीग स्पर्धांचं उदघाटन आज केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या पत्नी अनघा आर्लेकर यांच्या हस्ते होणार आहे.

**पंजाब**मध्ये चंदीगडमधे आयोजित महिलांच्या वॉकेथॉन स्पर्धेला सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी हिरवा झेंडा दाखवला.

**हरियाणा**त कुरुक्षेत्र इथं द्रोणाचार्य क्रीडासंकुलात आज महिलांच्या मॅरेथॉन स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. फरिदाबाद इथं आयोजित व्हिन्टेज कार आणि बाईक रॅलीचं उदघाटन कॅबिनेट मंत्री विपुल गोयल यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं सुमारे साडेतेहतीस हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं लोकार्पण तसंच पायाभरणी होणार आहे.

अठरा हजार तीनशे कोटी रुपये खर्चाच्या दिल्ली मेट्रो योजने अंतर्गत दोन मेट्रो मार्गिकांचाही यात समावेश आहे.

दिल्लीच्या सरोजिनीनगर परिसरात बांधलेल्या जीपीआरए वसाहतीला भेट देऊन आज प्रधानमंत्री मोदी यांनी महिला अर्जदारांना त्यांच्या सदनिकेच्या किल्ल्या सुपूर्द केल्या.

<><><><><>

भारताला ऊर्जेचा पुरेसा पुरवठा होत असून, कच्चं तेल, एलपीजी अथवा एलएनजीचा कोणताही तुटवडा नसल्याचं  केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग  पुरी यांनी म्हटलं आहे. दिवसातून दोनदा देशाच्या ऊर्जा परिस्थितीचा आढावा घेतला जात असून, आयातीचे विविध स्त्रोत वापरले जात आहेत, आणि त्यामुळे देशाची ऊर्जेची गरज भागेल, असं त्यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेकडे तेलाचा मुबलक साठा असून, तेल संकटाचा दबाव कमी करण्यासाठी यूएस स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह अर्थात अमेरिकेच्या  धोरणात्मक राखीव पेट्रोलियम साठ्याचा वापर केला जाईल, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. भारताला काही काळ रशियाकडून तेल खरेदी करता येईल, अशी घोषणा अमेरिकेचे  ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी केली होती, त्यावर प्रतिक्रिया  देताना  ट्रम्प यांनी माध्यमांना ही माहिती दिली.

भारतानं यापूर्वी रशियाकडून तेल खरेदी थांबवली होती आणि अमेरिकेकडून तेल खरेदी सुरु केली होती. त्यामुळे जागतिक बाजारपेठेतली  परिस्थिती सुधारेपर्यंत भारताला आपल्या ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी ही तात्पुरती सूट दिल्याचं बेसेंट  यांनी म्हटलं होतं.

<><><><><>

पश्चिम आशियामध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर आखाती प्रदेशातून आतापर्यंत ५२ हजारापेक्षा जास्त भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं  आहे. भारत सरकारचं  पश्चिम आशिया आणि आखाती प्रदेशातल्या घडामोडींकडे बारकाईनं लक्ष असून, विशेषतः अल्पकालीन भेटी दरम्यान  आखाती देशांमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांना मायदेशी परत आणण्यावर भर दिला जात असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. आखाती देशांमधलं  हवाई क्षेत्र अंशतः खुलं करण्यात आल्यामुळे  येत्या काही दिवसांमध्ये विमानाच्या आणखी फेऱ्या पाठवून सर्व भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे  मायदेशी आणलं जाईल असं ते म्हणाले.

दरम्यान, आखाती देशांमधल्या सर्व भारतीय नागरिकांनी स्थानिक प्रशासनानं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचं, तसंच तिथल्या भारतीय किंवा वाणिज्य दूतावासानं जारी केलेल्या सूचनांचं पालन करावं अशी सूचना परराष्ट्र मंत्रालयानं दिल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

पश्चिम आशियातली  सध्याची परिस्थिती लक्षात घेता, सीबीएसई, अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने या प्रदेशात येत्या ९, १० आणि ११ मार्च रोजी होणाऱ्या बारावीच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. येत्या १० मार्च रोजी एकूण परिस्थितीचा आढावा घेतला जाईल आणि १२ मार्च पासून सुरु होणाऱ्या परीक्षांबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, असं सीबीएसई नं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या संपर्कात रहावं आणि अधिकृत घोषणांचं पालन करावं असं यात म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे १४ ते १५ वर्ष वयोगटातल्या मुलींसाठी 'राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण' मोहिमेचा प्रारंभ आज होणार आहे. हा कार्यक्रम आज दुपारी दोन वाजता मुंबईच्या यशवंतराव चव्हाण केंद्रात होणार आहे.

<><><><><>

पश्चिम आशियामधल्या अस्थिर परिस्थितीमुळे, जागतिक बाजारातली वाढती जोखीम लक्षात घेता, यंदाच्या मार्च महिन्यात शेअर बाजारात परदेशी गुंतवणूकदारांनी विक्रीवर भर दिल्याचं बाजार नियामक मंडळाच्या अहवालात म्हटलं आहे. यंदाच्या मार्च महिन्यात गेल्या ४ व्यापारी सत्रांमध्ये परदेशी गुंतवणूकदारांनी २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या भारतीय समभागांची विक्री केली. मात्र, त्याच वेळी  भारतीय रोखे बाजारात ८५५ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक झाली. त्यामुळे भारतीय भांडवली बाजारातून बाहेर पडलेला निधी २० हजार ८१९ कोटी रुपयांवर पोहोचल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेची तीन दिवसीय बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. येत्या २५ ते २७ मार्च या कालावधीत ही बैठक कतरची राजधानी दोहा इथं नियोजित होती. मात्र पश्चिम आशियातली संघर्ष स्थिती लक्षात घेऊन बैठक एप्रिलमधे होईल असं सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

भारताच्या लक्ष्य सेनने ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात लक्ष्यने कॅनडाच्या व्हिक्टर लाय याचा २१-१६, १८-२१, २१-१५ असा पराभव केला. आज या स्पर्धेच्या

अंतिम फेरीत लक्ष्यचा सामना चीनी तैपेईच्या लीन चून ई याच्यासोबत होणार आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी पाच वाजता हा सामना होईल.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक विजेतेपदासाठी, भारत विरुद्ध न्यूझीलंड हा अंतिम सामना आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर रंगणार आहे. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत खेळण्याची भारताची ही चौथी वेळ आहे. तर न्यूझीलंड संघ दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला आहे.

**<><><><><>**

नेपाळमधील संसदीय निवडणुकीत प्रचंड विजय मिळवून बालेंद्र शाह यांचा राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष सरकार स्थापनेसाठी सज्ज झाला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवडणुका यशस्वी झाल्याबद्दल नेपाळच्या जनतेचं आणि सरकारचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

हिंद प्रशांत क्षेत्रात स्थैर्य राखण्यात भारताची भूमिका महत्वाची असून, प्रादेशिक शांतता आणि समृद्धीसाठी तैवानला भारतासारख्या देशांबरोबर काम करायला आवडेल, असं तैवानचे आमदार चिया-पिन चुंग यांनी एका भारतीय वृत्त संस्थेशी बोलताना सांगितलं. तैवानला चीन बरोबर शांततापूर्ण संबंध हवे असून, भारताचीही तीच भूमिका असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**//<><><><><>//**